| | | |
|---|---|---|
| एमएचएलए१३०००५९१२०२२ | दाखल तारीख | ०६.०५.२०२२ |
| | नोंदणी तारीख | ०६.०५.२०२२ |
| | निकाल तारीख | १७.०६.२०२६ |
| | कालावधी | वर्षे महिने दिवस |
| | | ०४ ०२ ११ |
| | निशाणी | <u>२५</u> |

**रेणापुर येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, यांचे न्यायालयात**
**ता. रेणापुर, जिल्हा- लातुर.**
(पिठासन अधिकारी - डी.एम. गित्ते)

**नियमीत फौजदारी खटला क्रं.१०५/२०२२**

गुन्हा नोंद क्र.३६/२०२२

| | |
|---|---|
| फिर्यादी/तक्रारदार | महाराष्ट्र शासन तर्फे<br>पोलीस निरीक्षक,<br>रेणापुर पोलीस स्टेशन,<br>ता. रेणापुर, जि. लातुर. |
| अभियोग पक्षातर्फे | सहाय्यक सरकारी अभियोक्ता<br>श्री.व्ही.सी.मुरळीकर. |
| आरोपी | **१. मंगेश ज्ञानोबा कराड (मयत),**<br>**२. उल्हास तुकाराम गंभिरे,**<br>वय:– ३८ वर्षे, धंदा:– शेती,<br>रा.वांगदरी, ता. रेणापूर, जि.लातूर. |
| आरोपींतर्फे विधीज्ञ | श्री. व्ही.ए.डिगोळे. |

**भाग — ब**

**(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | २६.०१.२०२२ |

| | | |
|---|---|---|
| फिर्याद दाखल दिनांक | :– | २६.०१.२०२२ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :– | ०६.०५.२०२२ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | :– | १७.०७.२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :– | १७.०७.२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :– | नाही. |
| न्यायनिर्णय दिनांक | :– | १७.०७.२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :– | निरंक. |

आरोपीची माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अतिंम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (set off) करण्या बाबत कलावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | नागनाथ विश्वनाथ पुंडकरे | नाही | ०५.१२.२०२५ | भा.दं.संहिता कलम ३२४, ४५२, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ प्रमाणे | निर्दोष मुक्त | नाही | |

**भाग – क**

**(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)**

सरकारपक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/
न्यायालयीन साक्षीदार

अ. अभियोगपक्ष –

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | पुराव्याचा प्रकार | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | महादेवी प्रदिप रेणापुरे | फिर्यादी | २० |

ब. आरोपीतर्फे साक्षीदार

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | पुराव्याचा प्रकार | निशाणी |
|---|---|---|---|
| -- | -- | -- | -- |

क. न्यायालयातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | पुराव्याचा प्रकार | निशाणी |
|---|---|---|---|
| -- | -- | -- | -- |

**अभीयोगपक्षातर्फे, आरोपीतर्फे, न्यायालयातर्फे देण्यात आलेल्या निशाणी**

अ. अभीयोगपक्षातर्फे

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी १ | दोषारोपपत्र |
| २. | निशाणी २१/अ.सा.क्र. १ | फिर्यादीची सही |

ब. आरोपीतर्फे

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| ३. | २३ | घटनास्थळ पंचनामा |
| ४. | २२ | वैद्यकिय प्रमाणपत्र |

क. न्यायालयातर्फे

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

ड. मुदेमाल

| अ.क्र. | आर्टिकल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

# न्यायनिर्णय
## (घोषणा तारीख १७ जुलै २०२६)

प्रस्तूतचा खटला आरोपींविरुध्द भा.दं.संहिता कलम ३२४, ४५२, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ या अपराधासाठी चालविण्यात आला.

०२. अभियोगपक्षाची हकिकत थोडक्यात खालीलप्रमाणेः–

फिर्यादी नामे महादेवी रेणापुरे हिचे पती हे गावातील आरोपी मंगेश कराड, उल्हास गंभिरे यांच्या सोबत दारु पिण्यासाठी जातात. त्यामुळे फिर्यादीने मंगेश व उल्हास यांना दिनांक २५.०१.२०२२ रोजी तुम्हाला दारु पिण्यासाठी जायचे असेल तर तुम्ही दोघे जा माझया नव–याला सोबत घेउन जात जाउ नका, त्यांना दारुची सवय लावु नका असे म्हणले. तेव्हा त्यांनी फिर्यादीच्या बोलण्याचा राग मनात धरुन दारु पिउन दिनांक २६.०१.२०२२ रोजी सकाळी १०.३० वाजेच्या सुमारास फिर्यादीच्या घरात घुसले. त्यांनी फिर्यादीला व तिची सासु लता रेणापुरे यांना म्हणत होते की, आम्ही तुझया नव–याला दारु पिण्यास कधी शिकवले. तसे म्हणुन त्यांनी फिर्यादीला शिवीगाळ करण्यास सुरवात केली व मंगेश कराड याने त्याच्या हातातील चाकुने फिर्यादीच्या उजव्या हातातील तळहातावर मारुन जखमी केले. तसेच, उल्हास याने फिर्यादीच्या पाठीत, हातावर लाथाबुक्यांनी मारहाण केली. घरातुन ते दोघे जात असतांना त्यांनी परत दारुची सवय लावली म्हणटले तर तुला खत्म करुन टाकिन अशि जिवे मारण्याची धमकी दिली. त्यामुळे फिर्यादीने आरोपींविरुद्व फिर्याद दाखल केली होती.

०३. सदर तक्रारीच्या अनुशंगाने गुन्हा रजिस्टर नंबर ३६/२०२२, भा.दं.संहिता कलम ३२४, ४५२, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये नोंदविण्यात आला. गुन्हयाचा तपास पूर्ण झाल्यानंतर न्यायालयात आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. आरोपी हजर झाल्यानंतर त्याच्याविरुद्व दोषारोप नोंदविण्यात आला. आरोपींनी गुन्हा कबुल नसल्याचे निवेदन देऊन न्यायालयीन

चौकशीची मागणी केली. सरकारी वकिलांच्या तोंडी विनंतीवरुन अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपींविरुध्द आलेल्या पुराव्यावरुन आरोपीचे भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम ३५१ अन्वये जबाब नोंदवीण्यात आले. आरोपीने त्याच्याविरुद्ध खोटी केस केल्याचा बचाव घेतला.

०४. अभिलेख, पुरावे पाहता, सदर प्रकरणात निकालासाठी खालील मुद्दे निघतात, ते मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे आहेत.

| **अ.नं.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे काय, आरोपींनी संगणमत करुन फिर्यादीला चाकु सारख्या घातक हत्याराने किरकोळ दुखापत करण्याच्या हेतुने गृहअतिक्रमण केले ? | .. नकारार्थी. |
| २. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे काय, आरोपींनी संगनमत करुन इच्छापुर्वक फिर्यादीला चाकु सारख्या घातक हत्याराने व लाथाबुक्यांनी मारहान करुन किरकोळ दुखापत केली ? | .. नकारार्थी. |
| ३. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे काय, आरोपींनी संगनमत करुन शांतता भंग करण्याच्या उददेशाने साक्षीदारांना शिवीगाळ करुन अपमानित केले | .. नकारार्थी. |
| ४. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे काय, आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीस जिवे मारण्याची धमकी देऊन फौजदारीपात्र धाकदपटशा गुन्हा केला ? | .. नकारार्थी. |
| ५. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

०५. अभियोगपक्षाने आरोपींविरुद्ध गुन्हा शाबीत करण्यासाठी फिर्यादी महादेवी

रेणापुरे (अ.सा.क्र.१) यांना तपासले आहे. अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द संशयापलीकडे गुन्हा शाबीत केला असा युक्तीवाद केला. याउलट आरोपीतर्फे विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, अभीयोगपक्षाने संशयापलीकडे गुन्हा शाबीत केला नाही असा युक्तीवाद केला.

**मुद्दा क्रमांक १ ते ५ करिता :–**

०६. सर्व मुद्दे हे परस्पर संलग्न असल्यामुळे त्याचे विवेचन एकत्रात केलेले आहे. सदर प्रकरणात साक्षीदार फिर्यादी महादेवी रेणापुरे (अ.सा.क्र.१) यांना तपासले. तिच्या पुराव्यात असे आले आहे की, तिच्या पतीच्या दारु पिण्यावरुन कारणावरुन त्यांच्यामध्ये व आरोपींमध्ये किरकोळ वाद झाला होता. त्यामुळे तिने फिर्याद दिली होती. उलटतपासात सदर साक्षीदाराने त्यांच्यामध्ये व आरोपीमध्ये भांडण मिटल्याचे कबुल केले आहे.

०७. सदर साक्षीदाराने अभीयोगपक्षाला सहाय केले नाही. त्यामुळे अभीयोगपक्षाने साक्षीदाराला उत्तर सुचक प्रश्न विचारले. परंतु पटलावर कोणताही पुरावा आरोपीविरुदध आला नाही. एकंदरीत साक्षीदाराच्या पुराव्यावरुन व अभिलेखावर दाखल पुरसीस वरुन आरोपीमध्ये व साक्षीदारामध्ये तडजोड झाल्याचे दिसुन येते. आरोपीने घटनास्थळ पंचनामा व वैदयकिय प्रमाणपत्र हे दस्त मान्य केले आहेत. परंतु साक्षीदाराच्या पुराव्यावरुन आरोपीने मयत आरोपीसोबत संगणमत करुन चाकु सारख्या घातक हत्याराने किरकोळ दुखापत करण्यासाठी गृहअतिक्रमण केले व मारहाण केली आणी लाथाबुक्यांनी मारहाण करुन किरकोळ दुखापत केली हे तथ्य संशयापलीकडे शाबीत होत नाही.

०८. तसेच, फिर्यादीच्या पुराव्यात आरोपींनी तिला काय शिवीगाळ केली व कोणती जिवे मारण्याची धमकी दिली हे सांगीतले नाही. त्यामुळे आरोपींनी

फिर्यादीला शिवीगाळ करुन अपमानीत केले व जिवे मारण्याची धमकी देउन धाकदपटशा गुन्हा केला हे संशयापलीकडे शाबीत होत नाही. आज रोजी फिर्यादी व आरोपीमधील वाद मिटला आहे. तसेच साक्षीदार खोटी साक्ष देत आहे याबाबत कोणताही पुरावा पटलावर आला नाही. त्यामुळे साक्षीदाराविरुध्द कोणतीही कार्यवाही करणे उचीत होणार नाही. त्यामुळे मी मुद्या क्र. १ ते ४ चे उत्तर नकारार्थी नोंदविला असून मुद्दा क्र. ५ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

**: आदेश :**

१. आरोपीची भारतीय नागरीक सुरक्षा संहितेच्या कलम २७१ (१) नुसार भारतीय दंड संहितेच्या कलम ४५२, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह वाचन कलम ३४ अन्वये ठेवलेल्या आरोपातुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे जामीन मुचलके रद्द करण्यात येतात.

३. जप्त मुददेमाल एक लोखंडी चाकु अपिल कालावधीनंतर जिल्हाधीकारी यांच्याकडे नियामाप्रमाणे पाठवीण्यात यावा.

४ आरोपीला भारतीय नागरीक सुरक्षा संहितेच्या कलम ४८१ अन्वये प्रत्येकी रक्कम रु.१५,०००/- च्या बंधपत्रावर सोडण्यात येते. सहा महिन्यानंतर आरोपींचे बंधपत्र आपोआप रद्द होतील.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by DNYANESHWAR MADHUKAR GITTE
Date: 2026.07.17 17:26:32 +0530

दिनांक- १७.०७.२०२६. (डी.एम. गित्ते)

१ले न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

रेणापुर.